पुणे महानगर मेट्रो रेल प्रकल्पातील पिंपरी चिंचवड ते स्वारगेट या मार्गिकेस व वनाझ ते रामवाडी या मार्गिकेच्या सुधारित प्रस्तावास मान्यता देण्याबाबत.

## महाराष्ट्र शासन

**नगर विकास विभाग**

शासन निर्णय क्रमांक : पीएमआर-३३१३/प्र.क्र.२९/नवि-७,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २९ ऑक्टोबर, २०१३.

विशेष कार्याधिकारी (मेट्रो सेल)
ओरियन बिल्डींग, कोरेगांव पार्क, पुणे-१.
पुणे महानगरपालिका
आवक क्रमांक : मेट्रोसेल/२८९
दिनांक : ०८/११/१३

संदर्भ : शासन निर्णय क्रमांक : पीएमआर-३३१०/प्र.क्र.१९/नवि-७,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ सप्टेंबर, २०१२.

**प्रस्तावना :**

पुणे महानगर प्रदेशातील वाढती लोकसंख्या आणि वाहनांची संख्या या अनुषंगाने निर्माण झालेली वाहतूक समस्या लक्षात घेता, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करणे गरजेचे झालेले आहे. पुणे व पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतूक समस्या निराकरणासाठी करावयाच्या विविध उपाययोजनांपैकी मेट्रो प्रकल्प राबविण्याकरिता पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने दिल्ली मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनची नेमणूक करुन त्यांच्याकडून सविस्तर प्रकल्प अहवाल अपेक्षिलेला होता.

दिल्ली मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन (डी.एम.आर.सी.) यांनी पुणे मेट्रो प्रकल्पाकरीता तयार केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये विविध छन्नमार्ग सुचविण्यात आलेले असून त्यामध्ये टप्पा-१ मध्ये "मार्गिका क्रमांक-१ : पिंपरी चिंचवड ते स्वारगेट" व "मार्गिका क्रमांक -२ : वनाझ ते रामवाडी" या मार्गिकांचा समावेश आहे. या अहवालातील तांत्रिक बाबी, व्यवहार्यता आणि आर्थिक निकष यांचा साधकबाधक विचार करुन पुणे महानगरपालिकेने मुख्य सभा ठराव ९०, दि. २३.६.२०१० अन्वये त्यांच्या क्षेत्रातून जाणा-या "मार्गिका क्र.२ वनाझ ते रामवाडी" या उन्नत मेट्रो प्रकल्पास मान्यता दिली आहे. तसेच "मार्गिका क्रमांक १ : पिंपरी चिंचवड ते स्वारगेट" या मार्गिकेस पुणे महानगर पालिकेने मुख्य सभा क्रमांक- ५१ ठराव क्रमांक ५७७, दिनांक २४.१२.२०१२ अन्वये व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मुख्य सभा क्रमांक ८ च्या ठराव क्रमांक १३३, दिनांक २०.९.२०१२ अन्वये मान्यता दिलेली आहे.

महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

शासनाच्या संदर्भाधीन निर्णयान्वये "मार्गिका क्रमांक -२ : वनाझ ते रामवाडी" या उन्नत मेट्रो प्रकल्पास यापूर्वीच मान्यता देण्यात आली होती. तथापि, सदर प्रकल्पाची कालमर्यादा व भांडवली खर्च

आता सुधारित झाल्याने या प्रकल्पास सुधारित मान्यता देण्याची व "मार्गिका क्रमांक-१ : पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट" या मार्गिकेस मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाला आहे. पुणे महानगर मेट्रो रेल्वे प्रस्तावामधील टप्पा १ अंतर्गत "मार्गिका क्र-१ (पिंपरी चिंचवड ते स्वारगेट- लांबी १६.५९ कि.मी.)" व "मार्गिका क्रमांक-२ (वनाझ ते रामवाडी - लांबी १४.९२५ कि.मी.)" यांचा समावेश आहे. "मार्गिका क्रमांक-१ : पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट" या मार्गिकेकरिता जानेवारी, २०१३ च्या दराने रु.५६१८ कोटी खर्च अपेक्षित असून प्रकल्प पुर्णत्वासाठी रु. ६९६० कोटी खर्च अपेक्षित आहे. "मार्गिका क्रमांक-२ : वनाझ ते रामवाडी" या मार्गिके करिता जानेवारी, २०१३ च्या दराने रु.२६६३ कोटी खर्च अपेक्षित असून प्रकल्प पूर्णत्वासाठी रु. ३२२३ कोटी खर्च अपेक्षित आहे. मार्गिका क्रमांक-१ यास मान्यता देण्याची तसेच मार्गिका क्रमांक-२ याच्या सुधारित प्रस्तवास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या संदर्भात सवंर्कष विचारांती शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**<u>शासन निर्णय :-</u>**

[I] पुणे महानगर मेट्रो रेल प्रकल्पातील टप्पा-१ मधील "मार्गिका क्रमांक-१ : पिंपरी चिंचवड ते स्वारगेट" या मार्गिकेस व "मार्गिका क्रमांक -२ : वनाझ ते रामवाडी" या मार्गिकेच्या सुधारित प्रस्तावास पुढील प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

१. पुणे महानगर मेट्रो रेल प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्यातील "मार्गिका क्र.१ : पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट" या अंशत: उन्नत व अंशत: भूयारी मेट्रो प्रकल्पास सोबत जोडलेल्या परिशिष्ट-१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

२. संदर्भाधीन शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेल्या पुणे महानगर मेट्रो रेल प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्यामधील "मार्गिका क्र.-२ : वनाझ ते रामवाडी" या प्रकल्पाच्या सुधारित कालमर्यादेस व सन २०१३ च्या दरावर आधारित भांडवली खर्चाच्या सुधारित प्रस्तावास परिशिष्ट-२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

३. पुणे महानगर मेट्रो प्रकल्पाच्या पहिल्या टप्यातील वर उल्लेखित दोन्ही मार्गिकांचे एकत्रीत प्रस्ताव केंद्र शासनाकडे मंजूरीस्तव सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. पुणे महानगर मेट्रो रेल प्रकल्पांतर्गत सदर दोन्ही मार्गिकांचे प्रकल्प राबविण्यासाठी" पुणे महानगर मेट्रो रेल कॉपोरेशन लिमिटेड" या नावाने एक स्पेशल पर्पज व्हेईकल (एस.पी.व्ही.) कंपनीची स्थापना करण्यात मान्यता देण्यात येत आहे. सदर एसपीव्हीमध्ये केंद्र शासनाच्या २०% आर्थिक सहभागाच्या तुलनेत राज्यशासन व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा एकूण ३०% आर्थिक सहभाग असल्याने राज्यशासन आणि महानगरपालिकांचे एकूण सहा संचालक सदर कंपनीच्या संचालक मंडळावर घेण्यास मान्यता देण्यात येत असून त्या अनुषंगाने केंद्रशासनास

विनंती करण्यात यावी. त्यानुसार सदर नियोजित एस.पी.व्ही कंपनीचे संचालक म्हणून खालील प्रतिनिधींचा समावेश राहील.:-

१. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन,
२. प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग, महाराष्ट्र शासन
३. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन
४. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका
५. महापालिका आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका
६. प्रधान सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन
७. केंद्र शासनाचे नामनिर्देशित अधिकारी- ५

५. "पुणे महानगर मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड" या कंपनीस सदर प्रकल्प अंमलबजावणी संबंधातील अधिकार दिल्ली मेट्रो रेल कॉपोरेशन (डी.एम.आर.सी.) च्या धर्तीवर देण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर कंपनी स्थापन होईपर्यंत सदर प्रकल्पासाठी कार्यान्वयीन संस्था म्हणून पुणे महानगरपालिका व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६. सदर प्रकल्प राबविण्यासाठी केंद्र शासन व रेल्वे प्रशासनाशी आवश्यक तो पत्र व्यवहार करण्यास व केंद्र शासनाकडून त्यांच्या सहभाग हिश्याची २०% निधी मिळविण्यासाठी पुणे महानगरपालिका तसेच प्रस्तावित पुणे महानगर मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर एसपीव्ही स्थापन होईपर्यंत प्रस्तुत प्रकल्पासंबंधी केंद्र शासनाशी पत्रव्यवहार करण्यास आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

७. पुणे महानगर मेट्रो रेल प्रकल्पाच्या टप्पा -१ मधील मार्गिका क्र.२ म्हणजे वनाझ ते रामवाडी या मेट्रो मार्गिकेसाठी पुणे महानगरपालिकेचा १०% सहभाग, राज्य शासनाचा २०% सहभाग, केंद्र शासनाचा २०% सहभाग व ५०% कर्ज वा इतर स्त्रोताद्वारे उभारणी करणे तसेच मार्गिका क्र.१ म्हणजे पिंपरी चिंचवड ते स्वारगेट या मार्गिकेसाठी दोन्ही महानगरपालिकांचा एकूण १०% आर्थिक सहभाग, राज्य शासनाचा २०% सहभाग, केंद्र शासनाचा २०% सहभाग व उर्वरित ५०% रक्कम कर्ज वा तत्सम आर्थिक स्त्रोतांद्वारे उभारणी करणे या आर्थिक ढाच्यास मान्यता देण्यात येत आहे .

८. पुणे महानगर मेट्रो रेल प्रकल्पांतर्गत "पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट" या मार्गिकेसाठी एकूण आर्थिक खर्चातील पुणे व पिंपरी-चिंचवड या महानगरपालिकांच्या एकूण १०% हिश्याची रक्कम दोन्ही महानगरपालिकांनी आपापल्या हद्दीत येणाऱ्या सदर मार्गिकेच्या खर्चाच्या प्रमाणात

(प्रो-रेटा बेसिस) विभागून "पुणे महानगर मेट्रो रेल कॉपोरेशन लिमिटेड" या एस.पी.व्ही.कडे वर्ग करावी असे या महानगरपालिकांना निदेश देण्यात येत आहेत.

९. सदर प्रकल्पासाठी निधी उभारणीच्या ढाच्यातील राज्यशासनाच्या २०% सहभाग हिस्सामध्ये शासकीय जमिनीची किंमत धरुन प्रकल्पासाठी आवश्यक असलेली शासकीय जमिन प्रचलित मुल्यांवर" पुणे महानगर मेट्रो रेल कॉपोरेशन लिमिटेड" या एस.पी.व्ही. कंपनीकडे वर्ग करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१०. सदर प्रकल्पासाठी निधी उभारणीच्या विविध स्त्रोतांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट -३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मंजूरी देण्यात येत आहे.

११. पुणे महानगर मेट्रो रेल प्रकल्प केंद्रीय मेट्रो अधिनियमाच्या तरतूदीखाली राबविण्यात येणार असल्याने सदर मेट्रो सेवेसाठी खालील तक्त्यात नमूद केल्यानुसार प्रवासी भाडे दरास तत्वत: मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | अंतर कि.मी मध्ये | सन २००९ मध्ये सुधारित केल्यानुसार दर (रु) | पुणे मेट्रोचे सन २०१८-१९ मधील दर (रु) |
|---|---|---|---|
| १ | ०-२ | ८ | १३ |
| २ | २-४ | १० | १७ |
| ३ | ४-६ | १२ | २० |
| ४ | ६-९ | १५ | २५ |
| ५ | ९-१२ | १६ | २७ |
| ६ | १२-१५ | १८ | ३० |
| ७ | १५-१८ | १९ | ३२ |
| ८ | १८-२१ | २१ | ३५ |
| ९ | २१-२४ | २२ | ३७ |
| १० | २४-२७ | २३ | ३८ |
| ११ | २७-३० | २५ | ४२ |
| १२ | ३० किमी पेक्षा जास्त | २७ | ४५ |

सदर भाडयामध्ये ठरावीक कालावधी नंतर आवश्यकते प्रमाणे सुधारणा करण्याचे अधिकार केंद्रीय मेट्रो अधिनियमाच्या तरतूदी नुसार स्थापन करावयाच्या भाडे निश्चिती समितीकडे ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१२. सदर प्रकल्पास निकडीचा सार्वजनिक प्रकल्प व महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प म्हणून घोषित करण्यास मान्यता देण्यात येत आहे ..

[II] पुणे महानगर मेट्रो प्रकल्पाच्या "पिंपरी ते निगडी" आणि "स्वारगेट ते कात्रज" अशा वाढीव मेट्रो मार्गिकेस (एकूण १५ की.मी. वाढीव लांबी) तत्वत: मान्यता देण्यात येत असून सदर वाढीव मेट्रो मार्गिकेचा टप्पा-२ मध्ये समावेश करुन त्याचा स्वतंत्रपणे प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यासाठी सदर वाढीव मार्गिकेकरिता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन घेण्यास व त्या आधारे प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

हा शासन निर्णय नियोजन विभाग अनौपचारीक संदर्भ क्र.१५५/१४४४, दिनांक १३.०८.२०१३ व वित्त विभाग अनौपचारीक संदर्भ क्र.४७०/व्यय-३, दिनांक १४.०८.२०१३ अन्वये प्राप्त अभिप्रायांचा विचार करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

२०/०८/२०१३
(एस.के. सालीमठ)
उपसचिव, महाराष्ट्र राज्य

प्रति,

मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव.
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
मा. राज्यमंत्री (नवि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
प्रधान सचिव (परिवहन), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
सचिव (विशेष प्रकल्प), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.
आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे.
आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड.
जिल्हाधिकारी, पुणे.
महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे, मुंबई.
महाव्यवस्थापक, पुणे महानगर परिवहन महामंडळ मर्यादित, पुणे.

## परिशिष्ट-१

**पुणे महानगर मेट्रो रेल मार्गाच्या टप्पा क्रमांक-१ मधिल मार्गिका क्रमांक- १ चा सविस्तर तपशील -**

| मार्गिका क्र. १ पिंपरी चिंचवड ते स्वारगेट | |
|---|---|
| एकूण लांबी | १६.५९ किमी |
| स्थानके | १५ |
| एकूण लांबी पैकी पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील लांबी | ७.१५ किमी. |
| पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील स्थानके | ६ (पूर्णपणे उन्नत) (इलिव्हेटेड) |
| पुणे मनपा हद्दीतील लांबी (खडकी कॅन्टॉमेंट हद्दीसह) | ९.४४ किमी. |
| पुणे मनपा हद्दीतील स्थानके (खडकी कॅन्टॉमेंट हद्दीसह) | एकूण ९ स्थानके. यापैकी ४.७८ किमी लांबीचा उन्नत मार्ग असून ३ स्थानके उन्नत व उर्वरित ४.६६ किमी लांबीचा मार्ग हा भूमिगत असून ६ स्थानके भूमिगत आहेत. |

********

## परिशिष्ट-२

**पुणे महानगर मेट्रो रेल मार्गाच्या टप्पा क्रमांक-१ मधिल मार्गिका क्रमांक २ चा सविस्तर तपशी**

-

| मार्गिका क्र. २ वनाझ ते रामवाडी | |
|---|---|
| एकूण लांबी | १४.९२५ किमी (पूर्णपणे उन्नत) |
| स्थानके | १५ (पूर्णपणे उन्नत ) |

*****

# परिशिष्ट- ३

[I] पुणे महानगर मेट्रो प्रकल्पासाठी निधीची उपलब्धता व्हावी म्हणून निधी उभारण्यासाठी निश्चित करण्यात आलेले आर्थिकस्त्रोत -

(i) मेट्रो मार्गिकांच्या दोन्ही बाजूस ५०० मी. अंतरापर्यंत येणाऱ्या जमिनीवर, अधिमूल्य आकारुन ४ चटईक्षेत्र निर्देशांकाच्या मर्यादेत अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक (एफएसआय) देण्याची तरतूद आपापल्या विकास नियंत्रण नियमावलीत करून त्यानुसार अधिमूल्याची रक्कम संबंधित महानगरपालिकेने वसूल करणे.

(ii) शासन अधिसूचित करेल असे महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प राबविण्यात येणाऱ्या शहरात महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतूदीनुसार आकारण्यात येणारे विकास शुल्क १००% पर्यंत वाढ करून आकारण्याविषयी कायद्यात तरतूद करणे व त्यानुसार वसूल होणारी वाढीव रक्कम अशा प्रकल्पासाठी वापरणे.

(iii) शासन अधिसूचित करेल असे महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प राबविण्यात येणाऱ्या महानगरपालिका क्षेत्रात मुंबई मुंद्राक अधिनियम, १९५८ अन्वये स्थावर मालमत्तेचे अनुक्रमे विक्री, देणगी व फलोपभोग गहाण यावरील संलेखावर बसवायच्या मुद्रांक शुल्कासोबतच जमीनी व इतर स्थावर मालमत्तेचे विक्री किंवा देणगीच्या बाबतीत अशा रितीने स्थित असलेल्या मालमत्तेच्या मुल्यांवर व फलोपभोग गहाणाच्या संलेखाच्या बाबतीत संलेखात मांडण्यात आलेल्या संलेखाद्वारे सुरक्षित रक्कमेवर १% अधिभार लावण्याची तरतूद महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात करुन अशा प्रत्यक्ष जमीनी व इतर स्थावर मालमत्तेचे अनुक्रमे विक्री, देणगी व फलोपभोग गहाण संलेखाच्या नोंदणीच्या वेळी सदर अधिभाराची रक्कम संबंधित जिल्हा उपनिबंधकांनी वसूल करणे व शासनाने यामाध्यमातून वसूल झालेल्या रक्कमेएवढे अनुदान संबंधित महानगरपालिका किंवा संबंधित महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्पासाठी नियुक्त एसपीव्ही यांस देणे.

(iv) मेट्रो स्टेशन व कार डेपोंच्या जागांच्या व्यावसायिक वापर करुन त्यानुसार विकसनाद्वारे प्राप्त होणारे उत्पन्न प्रस्तुत प्रकल्पासाठी वापरणे

(v) जाहिरात व पार्कींगपासून मिळणारे उत्पन्न प्रकल्पासाठी वापरणे.

[II] सदर स्त्रोतातून प्राप्त होणारा निधी संबंधीत महानगर पालिकांनी तयार केलेल्या एका वेगळया "नागरी वाहतूक निधी" मध्ये ठेवावयाचा असून त्याचा विनियोग सदर प्रकल्पासाठी महानगरपालिकांनी करावयाच्या अर्थसहाय्याचे प्रदान करण्यासाठी तसेच प्रकल्पाच्या कर्जाची परतफेड करण्याकरिता वर उल्लेखिलेल्या एसपीव्ही कंपनीकडे वर्ग करण्यासाठी करावयाचा आहे. सदर कर्ज परतफेडीसाठी "नागरी वाहतूक निधी" कमी पडल्यास दोन्ही महानगरपालिकांनी इतर स्त्रोतातून त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन द्यावयाचा आहे.

**************